E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 6.86

# AKSHARA

## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**January 2026 / Special Issue 22 / Volume VI (B)**

**One Day Interdisciplinary National Seminar on**

# Gender, Economy and Society: Pathway to Inclusive Development in India



**Chief Editor**
**Prof. (Dr) Advait Joshi**
Principal,
Mahavir Mahavidyalaya, Kolhapur

**Executive Editor**
**Dr. Ankush Gondage**
Head, Department of Sociology,
Mahavir Mahavidyalaya, Kolhapur

**Associate Editor**
**Dr. Sujata Patil**
Head, Department of Economics,
Mahavir Mahavidyalaya, Kolhapur

**Chief Editor : Dr. Girish S. Koli**

*Akshara Publication*

# Index


| Sr.N | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | लिंगभाव आणि शिक्षण : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. बी. व्ही. तौर | 09 |
| 2 | नोबेल विजेत्या अर्थशास्त्रज्ञ क्लोडिया गोल्डिन यांचे श्रम बाजारातील लिंग वेतन भेदभाव विषयक विश्लेषण : एक आढावा | प्रा.डॉ.संजय ओमासे | 12 |
| 3 | स्त्री शिक्षण ते समावेशक विकास : सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक-आर्थिक विचारांचे अध्ययन | डॉ. सुजाता जितेंद्र पाटील | 15 |
| 4 | लिंगभावाचे सामाजिक -सांस्कृतिक परिणाम : समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. विनोद खेडकर | 18 |
| 5 | रजपूत जातीवरील सर्वोत्तम पद्धती आणि व्यष्टी अध्ययन | श्री विलास भरतसिंग रजपूत | 25 |
| 6 | सामाजिक-सांस्कृतिक अडथळे आणि समावेशक विकास : भारतातील लिंगाधारित असमानता दूर करण्यासाठी धोरणात्मक आणि सामुदायिक स्तरावरील उपाययोजनांचा अभ्यास | डॉ. अंकुश एम. गोंडगे | 31 |
| 7 | लिंग समानता आणि आर्थिक वाढ यांचा परस्परसंबंध | प्रा.सखाराम दगडू हुंबे | 37 |
| 8 | डिजिटल साक्षरता आणि ग्रामीण महिला | सुप्रिया सखाराम हुंबे | 44 |
| 9 | लिंग समानता हे केवळ सामाजिक उद्दिष्ट नसून आर्थिक वृद्धीचे प्रमुख इंजिन | प्रा.एस. एच. हेरवाडे | 49 |
| 10 | स्वयंरोजगार व उद्योजकतेत महिलांची भूमिका | डॉ .योगेश बोराडे | 53 |
| 11 | मोगल–मर्दिनी ताराबाई: मराठा साम्राज्याच्या राजकारणातील स्त्री नेतृत्वाचा अभ्यास | प्रा.उत्तम बाळासो वडिंगेकर | 57 |
| 12 | भारतीय समाजातील लिंगभाव समस्या आणि गांधीवादी दृष्टीकोन | कॅप्टन प्रा.उमेश वांगदरे | 60 |
| 13 | बीड शहरातील तृतीयपंथीयांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक अभ्यास | डॉ. शामसुंदर आसाराम आगे | 64 |
| 14 | लिंग भेदाचे सामाजिक –सांस्कृतिक पैलु व स्त्री पुरुष पारंपारिक कामे | प्रा. शरद ना बोरवडेकर | 69 |
| 15 | लिंग समानता: इतिहास, संघर्ष आणि वाटचाल | अमित अशोक पाटील | 71 |
| 16 | क्रीडा क्षेत्रातील रोजगार संधी आणि महिलांचा सहभाग : आर्थिक विकासाचा मार्ग | प्रा. सुदर्शन एकनाथ पोवार | 74 |
| 17 | आरोग्य व कल्याणाचे सामाजिक निर्धारक : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.संगीता यशवंत पाटील | 78 |
| 18 | उच्च शिक्षण आणि स्त्रिया : संधी व अडथळे : एक समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. उन्नती पाटील | 82 |
| 19 | प्राचीन भारतातील महिला शिक्षणाचा अभ्यास | पियुष अशोककुमार डहाळे | 86 |
| 20 | ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्य व कल्याणावरील परिणामांचा विश्लेषणात्मक अभ्यास | शहाजी तुकाराम काळेल | 90 |
| 21 | शिक्षित स्त्रीसमोरील कुटुंबीय आव्हाने | डॉ. तानाजी रामभाऊ बोराडे | 94 |
| 22 | महाराष्ट्रातील आर्थिक वाढ आणि लिंग समानता: एक आव्हान | डॉ. विकास चांगदेव शिनगारे | 98 |
| 23 | लिंग आणि रोजगार:असमानता, अडथळे आणि प्रगतीचा शोध | कु. योगिता रामचंद्र रेवडे | 101 |
| 24 | लिंग आणि शिक्षण | सौ स्वाती रणजीत पाटील | 105 |
| 25 | आजच्या जीवनशैलीचा शारीरिक आरोग्यावर होणारा परिणाम | सय्यद बेबी अफरोज अहेमद | 107 |
| 26 | भोई जमातीतील महिला सक्षमीकरणातील अडथळे व उपाय योजना | अक्षता उदय मेंडगुळे | 111 |
| 27 | सामाजिक-सांस्कृतिक घटकांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लिंगभेदावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास | डॉ सुरेश संकपाळ | 115 |
| 28 | शिक्षणातील लिंग असमानता : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. भगवान डोंगरे | 121 |
| 29 | लोकशाही प्रक्रिया आणि महिलांचा राजकीय सहभाग | डॉ. कन्नाडे ममता कार्तिक | 124 |
| 30 | लिंग आणि शारीरिक शिक्षण : समानता, सहभाग आणि सक्षमीकरणाचा अभ्यास | लेफ्टनंट ज्योती विशाल लेंगरे | 129 |
| 31 | महिला मानवाधिकार शिक्षण | डॉ. संगिता दादासो महाजन<br>संयोगिता संतोष रोटे | 133 |
| 32 | लिंगभाव समानता आणि आर्थिक प्रगती: एक चिकित्सक अभ्यास | डॉ. रुपाली सतीश मोरे | 137 |
| 33 | आर्थिक विकासात महिलांच्या रोजगाराचे योगदान: एक विश्लेषणात्मक अभ्यास | नम्रता शहाजी कुंभार | 140 |
| 34 | भारतातील आणि पाश्चात्य राष्ट्रांतील नोकरीतील रजा नियम : तुलनात्मक अध्ययन | डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे | 144 |

AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 22 / Volume VI (B)

29

# लोकशाही प्रक्रिया आणि महिलांचा राजकीय सहभाग

डॉ. कन्नाडे ममता कार्तिक
समाजशास्त्र विभागप्रमुख,
चंद्राबाई शांतप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

**प्रस्तावना:** कोणत्याही समाजातील जनतेचा राजकीय सहभाग हा लोकशाही व्यवस्थेचा पाया आहे. भारतासारख्या खंडप्राय आणि विविधतेने नटलेल्या देशात स्त्री पुरुष समता ही लोकशाहीची महत्त्वाची अट आहे. कारण लोकशाही शासन पद्धतीमध्ये जनतेच्या सहभागाची अपेक्षा फार मोठ्या प्रमाणात केली जाते. भारतीय लोकशाहीमध्ये महिलांचा राजकीय सहभाग गेल्या काही दशकांमध्ये वाढत असला तरी राजकीय पक्षांच्या रचना, त्यांची कार्यपद्धती, नेतृत्व आणि उमेदवारी वितरणात आजही लिंग आधारित असमानता प्रकर्षाने दिसून येते. राजकीय पक्ष हे सत्तेचे केंद्र नसून सामाजिक प्रतिनिधित्व, नागरिकांची मागणी प्रक्रिया आणि धोरण निर्मितीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. स्त्रियांचा राजकीय सहभाग हे सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही शासनाच्या दृष्टिकोनातून आवश्यक ठरते.

भारताचा इतिहास ज्याप्रमाणे शूरवीरांनी घडविला त्याप्रमाणे महिलांनी देखील या देशाचा इतिहास घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महिलांची संख्या निम्म्याहून अधिक असून, निसर्गाने बुद्धी कौशल्य सर्वांना समान दिलेले असूनही इतिहास काळापासून तर आजपर्यंत महिलांना प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान मिळालेले पहावयास मिळते. दिनांक २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. व सर्व स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळाले.

जगाच्या लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रिया ह्या सर्वात उपेक्षित वर्ग आहेत. त्यामुळेच स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी विसाव्या शतकापासून विविध चळवळी सुरू झालेल्या पहावयास मिळतात. विशेषतः १९६० आणि १९७० च्या दशकात स्त्री मुक्ती चळवळीने वेग घेतला. आणि स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक सुधारणा घडवून आणल्या. आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारामुळे स्त्रियांना पाठबळ मिळाले. पितृसत्ताक समाज व्यवस्थेमुळे कमकुवत व शोषित असलेल्या स्त्रियांना एक प्रकारचे या माध्यमामुळे बळ मिळाले.

**उद्दिष्टे :**

1. स्त्रियांचा राजकारणातील सहभागाचा अभ्यास करणे
2. महिलांचा राजकारणात सक्रिय सहभागाचे महत्त्व जाणून घेणे
3. महिलांच्या राजकीय सहभागातील अडथळे शोधणे
4. महिला नेतृत्व व सहभाग वाढविण्यासाठी उपाय सुचविणे

**संशोधन पद्धती** : प्रस्तुत अध्ययनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचबरोबर दुय्यम सामग्रीचा (साहित्यिक लेखन, जर्नल, पुस्तके, इंटरनेट) वापर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्रामध्ये अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळीचा उगम झाला आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रातूनच सुरू करून सर्वांगीण महिला प्रबोधनाचे कार्य केले त्यामुळे राजकीय हक्क व अधिकार जागृतीबाबत महाराष्ट्रातील महिला या थोड्याफार जागृत आहेत. तरीसुद्धा महिलांचा राजकीय सहभाग आजही अपेक्षेपेक्षा कमी आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढले असले तरी राष्ट्रीय पातळीवर मात्र ते प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येते. ७३ व्या घटना दुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांसाठी एकूण जागापैकी एक तृतीय जागा राखून ठेवण्याची तरतूद केली गेली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर महिलांच्या नेतृत्वामध्ये वाढ झाली. याचा आधार घेत उडीसासारख्या काही राज्यांनी त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणासाठी कायदा केला आहे. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा राजकारणाच्या चौकटीतच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक प्रक्रियेशी संबंधित आहे. स्त्रियांच्या विकासात महिलांचा राजकीय सहभाग हा एक आवश्यक घटक मानला जातो.

'विकसित भारत' २०४७ अंतर्गत भारताला पूर्णपणे विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी विकसित भारत २०४७ ही सरकारची दृष्टी आहे. ही दृष्टी चार स्तंभांवर आधारित आहे: युवा, गरीब, महिला आणि अन्नदाता (शेतकरी). विकसित भारताचे स्वप्न साध्य करण्यासाठी सर्वसमावेशक प्रशासनाचीही आवश्यकता आहे. जिथे लिंगभेद न करता सर्व नागरिक राष्ट्राच्या विकासात योगदान देतात. महिलांचा राजकारणातील सहभाग हा केवळ लोकशाही आदर्श पूर्ण करण्यासाठी नव्हे तर तो सामाजिक न्याय, आर्थिक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एक प्रेरक शक्ती आहे. महिलांचा राजकारणातील सहभाग लोकशाहीला बळकटी देतो आणि सामाजिक न्यायाला व आर्थिक विकासाला चालनाही देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही म्हटलेलं आहे की राजकीय सत्ता ही सर्वसामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

**भारतीय संविधानातील स्त्रियांचे हक्क**: कलम १४ नुसार समान दर्जा व संधीचे अधिकार स्त्रियांना मिळालेली आहे. ते जर महिलांना मिळाले तर त्यांच्यामध्ये मूलभूत हक्काची जाणीव होऊ शकते.

कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यावरून कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही.

कलम १६ नुसार शासकीय सेवेत सर्वांना समान संधी असेल.

कलम २९ नुसार स्त्री-पुरुषांना शिक्षणाचा समान अधिकार दिलेला आहे.

**भारतातील स्त्रियांचा राजकीय सहभाग संदर्भातील अभ्यास :**

CSDS-Lokniti (२०१९) च्या अभ्यासानुसार महिलांचे मतदान प्रमाण पुरुषांपेक्षा अनेक राज्यांत जास्त झाले आहे, परंतु नेतृत्वाच्या पातळीवर त्यांची उपस्थिती खूपच कमी आहे.

Nussbaum (२०००) यांनी क्षमता दृष्टिकोनातून असे दाखवले की शिक्षण, आरोग्य, आर्थिक सुरक्षितता आणि सामाजिक पाठबळ नसल्यास राजकीय सहभाग मर्यादित राहतो.

UN Women (२०१८) च्या अहवालानुसार जगातील अनेक देशांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व २४% पेक्षा कमी आहे.

**महिलांचा राजकारणातील सहभाग :**

| अ. क्र. | लोकसभा | जागा | निवडून आलेले स्त्री सभासद |
|---|---|---|---|
| १ | १९५२ | ४९९ | २२ |
| २ | १९५७ | ५०० | २७ |
| ३ | १९६२ | ५०३ | ३४ |
| ४ | १९६७ | ५२३ | ३१ |
| ५ | १९७१ | ५४४ | २२ |
| ६ | १९७७ | ५२१ | १९ |
| ७ | १९८० | ५४४ | २८ |
| ८ | १९८४ | ५४४ | ४२ |
| ९ | १९८९ | ५१७ | २७ |
| १० | १९९१ | ५४४ | ३९ |
| ११ | १९९६ | ५४३ | ३९ |
| १२ | १९९८ | ५४३ | ४३ |
| १३ | १९९९ | ५१३ | ४९ |
| १४ | २००४ | ५४५ | ४५ |
| १५ | २००९ | ५४३ | ५९ |
| १६ | २०१४ | ५४३ | ६२ |
| १७ | २०१९ | ५४३ | ७८ |
| १८ | २०२४ | ५४३ | ७४ |

**Source- General election to Lok Sabha- statical report election commission- New Delhi**

लोकसभेत (१८ व्या लोकसभा, २०२४): १८व्या लोकसभेत एकूण ७४ महिला सदस्य आहेत – जे लोकसभेतील सदस्यसंख्येच्या १३.६% एवढे होते. १७व्या लोकसभेत ७८ महिला होत्या. ती १८व्या लोकसभेमध्ये कमी होऊन ७४ एवढी झाली.

राजकीय सहभाग हा महिला सक्षमीकरण साध्य करण्यासाठी सर्वात शक्तिशाली माध्यमापैकी एक आहे. संयुक्त राष्ट्रांमधील भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज यांनी सांगितले की विकसित भारताच्या दृष्टिकोनासाठी महिलांचा पूर्ण आणि समान सहभाग आवश्यक आहे. भारताचे कामगार आणि रोजगार मंत्री तसेच पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्री श्री भूपेंद्र यादव यांनी म्हणते की विकसित भारताचे स्वप्न केवळ महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाद्वारेच साकार होऊ शकते.

**भारतीय राजकारणातील महिला आमदारांची सद्यस्थिती (2025) :**

| राज्य | एकूण संख्या | महिलांचे प्रमाण |
|---|---|---|
| बिहार | २४३ | ३४ |
| राजस्थान | २०० | २८ |
| पश्चिम बंगाल | २९४ | ३४ |
| आंध्र प्रदेश | २९४ | ३४ |
| उत्तर प्रदेश | ४०३ | ३२ |
| महाराष्ट्र | २८८ | ११ |
| कर्नाटक | २२४ | ३ |

| | | |
|---|---|---|
| ओडिशा | १४७ | ७ |
| केरळ | १४० | ७ |
| हिमाचल प्रदेश | ६८ | ५ |
| दिल्ली | ७० | ३ |
| जम्मू-काश्मीर | ८७ | ३ |
| त्रिपुरा | ६० | ३ |
| मणिपूर | ६० | ३ |
| मेघालय | ६० | १ |
| हरियाणा | ९० | ९ |
| झारखंड | ८१ | ८ |
| पंजाब | ११७ | १४ |
| छत्तीसगड | ९ | ११ |
| उत्तराखंड | ७० | ५ |

PRS Legislative Research, ADR/Election Commission of India

**यावरून असे** दिसून येते की बिहार, राजस्थान, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये महिला आमदारांची संख्या जवळजवळ १४% च्या आसपास आहे तर इतर राज्यांमध्ये मात्र महिलांचे प्रमाण कमी आढळून येते.

**राजकारणात महिलांच्या सहभागाचे महत्त्व :** आरोग्यसेवा, शिक्षण, सामाजिक कल्याण आणि लिंग समानता यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर महिलांचा वेगळा दृष्टिकोन असतो. महिलांचा सहभाग लोकशाहीची गुणवत्ता वाढवतो. जिथे महिलांचा समान सहभाग असतो ती लोकशाही अधिक मजबूत, अधिक लवचिक आणि अधिक प्रतिनिधी असते. राजकारणातील महिला बदलाचे प्रतिनिधी म्हणून काम करू शकतात. सामाजिक असमानता दूर करणाऱ्या धोरणाचे समर्थन करू शकतात, राहणीमान सुधारू शकतात आणि विकासाला चालना देऊ शकतात. त्यांचे नेतृत्व मानवी विकासाला प्राधान्य देणारी धोरणे बनवू शकते, जे विकसित भारतासाठी महत्त्वाचे आहे. जसे भारतातील पंचायतीच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की महिलाच्या नेतृत्वाखालील परिषदांनी पुरुषांच्या नेतृत्वाखालील परिषदांपेक्षा ६२% जास्त पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प राबविले आहेत. त्याचबरोबर त्या स्वच्छता घरगुती हिंसाचार यासारख्या बाबी देखील हाताळल्या आहेत.

**राजकारणातील महिलांचे योगदान :**

भारताच्या इतिहासामध्ये पहिल्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी १९७१ चे भारत पाकिस्तान युद्ध आणि बँक राष्ट्रीयकरणासारख्या आर्थिक सुधारणा केल्या.

सुषमा स्वराज या परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. सोनिया गांधी ने देखील काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करून राजकारणामध्ये योगदान दिले. पहिल्या महिला अर्थमंत्री म्हणून निर्मला सीताराम यांनी देखील राजकारणामध्ये भूमिका बजावली. जागतिक पातळीवर वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) च्या रिपोर्टनुसार २००६ ते २०२२ या कालावधीत मंत्रीपद मिळविलेल्या महिलांचा जागतिक वाटा दुप्पट झाला असला तरी तो ९.९% वरून १६.१% पर्यंत वाढला आहे. आणि संसदेतील महिलांचा जागतिक सरासरी हिस्सा १४.९% वरून २२.९% झाला आहे. दक्षिण आशियाई मध्ये पितृसत्ताकसमाज व्यवस्थेमुळे राजकारण तर लांबचीच गोष्ट आहे स्त्रियांचे पुरेशा प्रमाणात सक्षमीकरण देखील झालेले नाही.

**महिलांच्या राजकीय सहभागाचे फायदे :**

1. महिलांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करण्याची संधी प्राप्त होते.
2. शासनाच्या नियोजन व निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त होते.
3. दलित आदिवासी अल्पसंख्यांक महिला नेतृत्वाचा उदय होऊ शकतो.
4. प्रचलित समाज व्यवस्थेकडून महिलांचे होणारे सामाजिक मानसिक शारीरिक शोषण थांबेल व प्रचलित हुंडाबळी, बलात्कार यासारख्या समस्या कमी होऊ शकतील..
5. महिला संघटनाना आपल्या समस्या व प्रश्न राष्ट्रीय पातळीवर मांडण्याची संधी प्राप्त होईल.
6. स्त्रियांचे आरोग्य, दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण व समाजरचने सुधारणा घडवून आणण्याच्या प्रक्रियेला चालना मिळेल.

**स्त्रियांच्या राजकीय सहभागातील अडथळे :**

1. संशोधनानुसार (NCRW, UNDP) महिलांना राजकारणात सामील होण्यासाठी सर्वात मोठी अडथळे म्हणजे पितृसत्ताक मूल्य व्यवस्था होय.
2. पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि पुरुषप्रधान समाजव्यवस्था.

घरगुती जबाबदाऱ्या महिलावर घरगुती कामाचा मोठा भार असतो.

3. राजकीय हिंसा व सुरक्षिततेचा अभाव
4. 'पुरुष म्हणजे राजकारणासाठी योग्य' असा रूढीवादी दृष्टिकोन
5. स्त्रियांच्या नेतृत्व क्षमतेविषयी सामाजिक शंका
6. सामाजिक प्रतिमा
7. आर्थिक संसाधनांचा अभाव - निवडणुकीतील खर्च, प्रचार साधने, निधी संकलन या सर्व गोष्टींमध्ये महिलांकडे संसाधनांची कमतरता दिसते.
8. महिला संघटनांची भूमिका - पक्षाच्या महिला सेलमार्फत प्रशिक्षण, मोहीमा, जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जातात; मात्र निर्णयक्षम अधिकार कमी असल्याने या विभागांचा उपयोग मर्यादित राहतो.
9. भारतात असलेले जात धर्म रूढी परंपरा भेद हे महत्त्वाचे अडथळे आहेत.
10. राजकारणात महिलांना ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही ठिकाणी वारंवार छळ धमकी आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो. हे धोके महिलांना राजकारणात सक्रियपणे सहभागी होण्यापासून परावृत्त करतात.
11. आरक्षण विरोधी भूमिका - महिलांचे राजकीय सबलीकरण होऊ नये असे पुरुषांना वाटते. कारण लोकसभेत महिला विधेयक मंजूर झाले तर देशातील सर्व विधानसभेत हे विधेयक लागू करावे लागेल व राज्याच्या प्रत्येक विधानसभेत 33 टक्के महिला प्रतिनिधित्व मिळेल. देशातील सर्व राज्याच्या विधानसभेतील एकूण जागांची संख्या 4120 आहे. या आरक्षणामुळे देशातील महिला आमदारांची संख्या 1360 होईल. हे आरक्षण मिळाले तर लोकसभेत महिला खासदारांची संख्या 179 होईल त्याच बरोबर जे नेते राष्ट्रीय व राज्य पातळीवर नेतृत्व करतात त्यांची मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित होतील.

12.

**महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठीचे उपाय :**

1. महिलांचा राजकारणातील सहभाग वाढविण्यासाठी शिक्षण हे एक महत्त्वाचे साधन आहे.
2. महिलांसाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
3. महिलांसाठी वित्तपुरवठा करणे
4. महिलांना राजकीय क्षेत्रात हिंसाचार, छळ आणि धमकी पासून संरक्षण देण्यासाठी मजबूत कायदेशीर चौकटी लागू करणे.
5. महिलावरील अत्याचाराचे निराकरण करणे व दारिद्र्याचे उच्चाटन करणे
6. महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे व त्यासाठी रोजगार निर्मिती करणे
7. महिलांच्या संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे
8. प्रसार माध्यमांच्या वापराद्वारे महिलांचे हक्क प्राप्तीसाठी जनजागृती करणे
9. राजकारणातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे.

तसेच राजकीय पक्ष आणि नागरिकांकडून सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. महिलांचा राजकारणात सहभाग हे केवळ लिंग समानतेसाठी नसून एक विकसित, समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय राजकारणामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अद्याप पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. राजकारणामध्ये स्त्रियांचा सहभाग ही केवळ स्त्रियांची मागणी नाही तर लोकशाहीची अनिवार्य अट आहे. प्रत्येक राजकीय पक्षांनी लिंग समता दृष्टिकोन आत्मसात केल्याशिवाय भारतातील लोकशाही अधिक समतोल आणि प्रातिनिधीक होऊ शकत नाही. लिंग संवेदनशील राजकारण हे भविष्यातील भारताची गरज आहे. महिलांना समान संधी, प्रतिनिधित्व आणि नेतृत्व उपलब्ध करून दिल्यास भारतातील लोकशाही अधिक सक्षम आणि समतोल बनेल. प्रचंड लोकसंख्येच्या अर्ध्या भागाचे प्रतिनिधित्व कमी असणे हे लिंगसमतेच्या दृष्टीने व लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक बाब आहे.

समता हे तत्व आम्ही स्वीकारलेले असले तरी भारतात परंपरागत विचारांचा पगडा समाजावर असल्याने स्त्रियांचे सक्षम राजकारण या प्रक्रियेला चालना मिळत नाही. म्हणून आज तरी ग्रामपंचायतीपासून तर लोकसभेपर्यंत जास्तीत जास्त महिलांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे. यासाठी १९९० मध्ये भारतात तर १९९३ मध्ये महाराष्ट्रात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाली. सरकारने ८० कलमी महिलांचे विकासाचे धोरण ठरविले परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही उलट महिलावरील शारीरिक व मानसिक शोषणाचे प्रमाण वाढतच गेले. त्याला कारण म्हणजे महिलांच्या राजकीय इच्छाशक्तीची कमतरता व त्याची पुरुषाकडून झालेले दमन होय. आज स्त्रीभ्रूणहत्या, महिला आरोग्याची हेळसांड, हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार या घटना वाढतच आहेत. आणि हे जर थांबवायचे असेल तर महिलांना सक्षम राजकीय व्यासपीठ मिळवून देणे व त्याचा राजकीय सहभाग वाढवून त्यांचे राजकीय सबलीकरण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. असे झाले तरच समता, न्याय आणि स्वातंत्र्याची खरी मूल्य रुजली जातील.

AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 6.86 / January 2026 / Special Issue 22 / Volume VI (B)

सदर अभ्यासातून महिलांचा राजकीय सहभाग, संविधानामध्ये स्त्रियांना दिलेला हक्क, राजकारणातील महिला सहभागाचे महत्त्व, राजकारणातील महिलांची योगदान, महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठीचे उपाय या सर्व बाबींचा शास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे या अभ्यासामध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोन **स्त्रीवादी सिद्धांत** याचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासातून असे आढळून आले की, महिलांचा राजकीय सहभाग केवळ संख्यात्मक पातळीवर नव्हे तर निर्णयक्षम नेतृत्वात देखील वाढविण्याची गरज आहे. भविष्यामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी धोरणात्मक उपाय आरक्षण आर्थिक बळकटी आणि सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची**

1. कुलकर्णी बी. वाय राजकीय समाजशास्त्र 2003 विद्या प्रकाशन नागपूर
2. Indian streams research journal volume 4 issue 12 January 2015
3. Pateman, Carole (1988). The Sexual Contract. Stanford University Press.
4. CSDS-Lokniti (2019). Status of Women in Indian Politics.
5. Election Commission of India (Various Reports).
6. Inglehart, R. & Norris, P. (2003). Rising Tide: Gender Equality and Cultural Change Around the World.
7. इकॉनॉमिक फोरम 2022 रिपोर्ट
8. https://www.orfonline.org/marathi/research/pushing-gender-inclusive-politics-marathi
9. Sarda, D. (2023). Political Participation and Women Empowerment. International Journal of Novel Research and Development,
10. PRS Legislative Research, ADR/Election Commission of India